-: प्रेसनोट दिनांक - ०५/१०/२०२४ :-

आरोपी लोकसेवक १) सचिन सिताराम कांबळे, वय - ४५ वर्षे, जिल्हा समन्वय अधिकारी, महिला आर्थीक विकास महामंडळ जिल्हा परीषद समोर नागाळा पार्क,कोल्हापूर रा. महालक्ष्मी टेरेस अपार्टमेंन्ट ए - ४०२, दुसरा मजला देवकर पानंद कोल्हापूर, मुळ रा. प्लॉट नं.३९, पंडीतराव जाधव नगर राम मंदिरजवळ पाचगाव, ता. करवीर, जि.कोल्हापूर २) उमेश बाळकृष्ण लिंगनुरकर वय -४६ व्यवसाय - नोकरी, सहायक सहनियंत्रक अधिकारी महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा परीषद समोर नागाळा पार्क,कोल्हापूर रा. २८७५ सी वॉर्ड समाज मंदिर जवळ,सिध्दार्थ नगर कोल्हापूरयांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........

---

यातील तकारदार यांची कोल्हापूर येथे कपडे तयार करण्याचे गारमेंन्ट असुन ते जिल्हा परिषद तसेच खाजगी शाळांचे शालेय गणवेश तयार करुन देण्याचे काम घेत असतात महिला आर्थीक विकास महामंडळ, कोल्हापूर यांचेकडून करवीर तालूका येथील जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडील १९ केंद्र शाळांना गणवेश पुरवठा करण्याचे काम तकारदार यांचे ओळखीच्या स्वयंसहाय्यता महिला समुहास मिळाले होते. त्यांचे वतीने तकारदार यांनी सदरचे काम पुर्ण करण्याचे व काम पुर्ण झाल्यानंतर बिल मिळणेबाबतचे काम त्यांचे वतीने करण्याचे त्यांचेत ठरले होते त्याप्रमाणे तकारदार यांनी सदरचे काम पुर्ण करून महिला गटास दिले. सदर शालेय गणवेश तयार करण्याचे कामाचे एकुण बिल १८,३५,८१४/- रुपये इतके झाले होते. त्यापैकी तकारदार यांनी महिला आर्थीक विकास महामंडळ, कोल्हापूर यांचेकडे केलेल्या पाठपुराव्यानंतर १४,३५,०००/- रुपये बिल स्वयंसहाय्यता महिला समुह यांचे बॅक खात्यामध्ये वेळोवेळी जमा झालेले ते तकारदार यांना त्यांचेकडुन मिळाले त्यानंतर उर्वरित बिलाबाबत तकारदार महिला आर्थीक विकास महामंडळ, कोल्हापूर येथील उमेश लिंगणुरकर यांची भेट घेवून विचारले असता त्यांनी तकारदार यांना तुमचे १४,३५,०००/- चे बिल मंजुर केलेले आहे. बिल मंजुर केले म्हणुन तसेच शिल्लक राहीलेले बिल मंजुर करावयाचे असले तर तुम्हाला मला व सचिन कांबळे साहेब यांना मिळून ८०,०००/- रुपये हे दयावे लागतील तरच शिल्लक राहीलेले बिल मंजुर होईल असे म्हणुन तकारदार यांचेकडे ८०,०००/- रूपयांची लाचेची मागणी केली होती. त्यानंतर तकारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे तकार दिलेली होती.

तकारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तकार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये तकारदार यांनी महिला सहाय समुह यांचेवतीने केलेल्या १९ केंद्र शाळेच्या गणवेश तयार केलेल्या कामाचे एकुण बिल १८,३५,८१४/- रुपये बिलापैकी १४,३५,०००/- मंजुर केले म्हणुन व शिल्लक राहीलेले बिल मंजुर करण्यासाठी आलोसे १) सचिन सिताराम कांबळे २) उमेश बाळकृष्ण लिंगनुरकर यांनी तकारदार यांचेकडे ८०,००० रूपयांची लाच मागणी केलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तकारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक उमेश बाळकृष्ण लिंगनुरकर वय -४६ व्यवसाय - नोकरी, सहायक सहनियंत्रक अधिकारी महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा परीषद समोर नागाळा पार्क,कोल्हापूर रा.२८७५ सी वॉर्ड समाज मंदिर जवळ,सिध्दार्थ नगर कोल्हापूर यांनी ८०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले.

सदरबाबत आरोपी लोकसेवक १) सचिन सिताराम कांबळे, वय - ४५ वर्षे, जिल्हा समन्वय अधिकारी, महिला आर्थीक विकास महामंडळ जिल्हा परीषद समोर नागाळा पार्क,कोल्हापूर रा. महालक्ष्मी टेरेस अपार्टमेंन्ट ए - ४०२, दुसरा मजला देवकर पानंद कोल्हापूर, मुळ रा.प्लॉट नं.३९, पंडीतराव जाधव नगर राम मंदिरजवळ पाचगाव, ता. करवीर, जि.कोल्हापूर २) उमेश बाळकृष्ण लिंगनुरकर वय -४६ व्यवसाय - नोकरी, सहायक सहनियंत्रक अधिकारी महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा परीषद समोर नागाळा पार्क,कोल्हापूर रा.२८७५ सी वॉर्ड समाज मंदिर जवळ,सिध्दार्थ नगर कोल्हापूरयांचेविरूध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.कोल्हापूर, श्रीमती आसमा मुल्ला, पोलीस निरीक्षक, श्री प्रकाश भंडारे, सहा.पोलीस उपनिरीक्षक श्री विकास माने, पो.हे.कॉ संदिप काशीद, पो.ना.सचिन पाटील, पो.कॉ. कृष्णा पाटील ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७.
कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४. ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.

(वैष्णवी पाटील)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर